स. फौजदारी खटला क्र. ११८०/२०२२
गजानन विरूद्ध वैजनाथ
**निशाणी ३८**

**बचाव पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबाणी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | वैजनाथ उत्तमराव मिसाळ, |
| वय | : | ४२ वर्षे, |
| धंदा | : | नौकरी |
| राहणार | : | शिवनगर, तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला. |

**सरतपासणी — आरोपी तर्फे ॲड श्री. एम. झेड. राठी यांचे मार्फत.**

मी फिर्यादीला ओळखतो. मला सन २०२० मध्ये पैशांचे काम पडले होते. मी फिर्यादीकडुन सन २०२० मध्ये एक लाख रूपये घेतले होते. मला माझे मागणीनुसार ३१ जुलै २०२० रोजी फिर्यादीने फोन पेद्वारे रू. ५०,०००/—, २५,०००/— व रू. ५,०००/— तसेच दि. ०१ ऑगस्ट २०२० रोजी रू. २०,०००/— असे पाठवले होते. सदर रकमा मला प्राप्त झाल्या होत्या. सदर रकमा मला प्राप्त झाल्याबाबत माझा बॅक खात्याचा तत्कालीन उतारा मी अभिलेखावर दाखल केला आहे. सदर उतारा मी बॅकेकडुन संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त केला आहे. माझा सदर खाते उतारा शाबित करण्यासाठी मी संबंधीत साक्षीदाराची साक्ष नोंदवणार आहे. मी सदर पैसे घेतांना दोन कोरे धनादेश घ ेतलेल्या रकमेच्या सुरक्षेपोटी फिर्यादीला दिले होते. सदर दोन कोरे धनादेश मी शरद गडेकर याचे समक्ष फिर्यादीला दिले होते. मी फिर्यादीला घेतलेले पुर्ण पैसे वापस केले होते. तत्पुर्वी फिर्यादीने मी दिलेल्या धनादेशांपैकी एक धनादेश बॅकेत वटवण्याकामी टाकलेले होता. त्यामुळे मी त्यांना पैसे परत केले होते. पैसे दिल्यानंतर मी फिर्यादीला माझे धनादेश परत मागितले परंतु फिर्यादीने देतो—देतो असे सांगुन परत दिले नाहीत. त्यापैकी, एक धनादेश फिर्यादीने वटवण्याकामी टाकला व माझ्यािवरूध्द पैसे उकळण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे. प्रस्तुतची केस खोटी आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — फिर्यादीतर्फे ॲड. एस. एस. चांडक यांच्यामार्फत.**

२. मी तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंतर्गत कुटासा मुख्यालयी नौकरीस आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व माझे तालुक्याचे कार्यालय सामाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व मी एकाच ठिकाणी काम

करतो. फिर्यादीसोबत सरतपासात नमुद व्यवहाराव्यतिरीक्त माझे इतर कोणतेही नगदी आर्थिक व्यवहार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही व्यक्तीसोबत व्यवहार केल्यानंतर व्यवहार पुर्ण झाल्यावर त्या व्यक्तिला दिलेले कागदपत्र मी परत मागतो. मी फिर्यादीला धनादेश परत मिळावेत म्हणुन लेखी मागणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने माझेविरूध्द खोटी केस केली याबाबत मी आक्षेप घेतलेला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मला नोटीस मिळालीच नाही त्यामुळे मी आक्षेप घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीकडुन चार लाख रूपये घेतले होते व त्याच्या परताव्यापोटी धनादेश (निशाणी १९) फिर्यादीला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीकडुन घेतलेले चार लाख रूपये परत देण्याचा माझा उद्देश आहे व त्यामुळे मी आज खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. १२.०९.२०२५
अकोट